# प्रकरण चौथे

## वसंत नरहर फेणे यांच्या कथा लेखनाची वाङ्‌मयीन अभिव्यक्ती

# प्रकरण चौथे

## वसंत नरहर फेणे यांच्या कथालेखनाची वाङ्:मयीन अभिव्यक्ती

### प्रास्ताविक :-

प्रस्तूत प्रकरण एक दोन व तीनमधून मराठी कथेची वाटचाल लेखकांचा व्यक्ती व साहित्य परिचय आणि ''ज्याचा त्याचा क्रूस'' व ''पाणसावल्यांची वसाहत'' या कथासंग्रहातील कथांचा आशय, विषयाच्या अनुषंगाने अभ्यास केला. सदर प्रकरणात वरील कथासंग्रहातील कथांतील वाङ्:मयीन अभिव्यक्ति विशेषांचा अभ्यास करावयाचा आहे. अभिव्यक्तिचा अभ्यास करताना त्यामध्ये त्या कथासंग्रहात येणारी व्यक्तिचित्रणे, प्रसंगनिर्मिती, वातावरणनिर्मिती, आशय जाणिवा, भाषिक वैशिष्ट्ये आणि अन्य कथाविशेषांचा अभ्यास केला आहे.

### व्यक्तिचित्रणे -

व्यक्तिचित्रण हा कथालेखनातील अतिशय महत्त्वाचा घटक आहे. कथेमध्ये कथानकाला जितके महत्त्व असते तितकेच महत्त्व व्यक्तिदर्शनाला असते. घटना, प्रसंगा इतकेच कथेत स्वभावचित्रणाला महत्त्व आहे. एखाद्या व्यक्तीचे मन, स्वभाव, अंतर्मन याचे चित्रण महत्वाचे असते. '' कथानक रचनेपेक्षा व्यक्तीदर्शन चातुर्य दसपटीने अधिक महत्वाचे आहे.''[१] ना. सी. फडके म्हणतात. पृ.क्र. १०९

जुन्या कथाकारांनीही माणसाच्या वर्तनातील वरवरच्या चित्रणाला महत्त्व दिले. त्यांनी व्यक्तीच्या अंतर्मनाचा शोध न घेता एकाच पातळीवरून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची ओळख चित्रित करण्यात धन्यता मानली. नवकथेचे शिल्पकार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गाडगीळ, गोखले, भावे व माडगूळकर या नवकथाकारांनी माणसाच्या अंतर्विश्वात प्रवेश करुन, त्यांच्या व्यक्तीमनातील विविध पैलू, संगती, संघर्ष या साऱ्यांचे अत्यंत उत्कटतेने चित्रण केले.

व्यक्तिचित्रणाबद्दल गंगाधर गाडगीळ म्हणतात, " १९४०-४५ पर्यंतची कथा ही कथानक प्रधान होती. १९४५ नंतरच्या नवकथेच्या प्रमुख शिल्पकारांनी मात्र लघुकथेत व्यक्त होणाऱ्या अनुभवालाच महत्त्व दिले. मनोविश्लेषण हा त्यांच्या कथेचा एक अविभाज्य भाग आहे. त्याला माणसाच्या गुंतागुंतीचे व्यक्तीत्त्वाचे दर्शन आपल्या कथातून मराठी वाचकांना घडविले. आणि मानवी व्यक्तित्वाच्या अजाणतेपणात बुडालेल्या भागाचे चित्रण करुन त्याला एक नवे परिणाम व पूर्णत्व दिले."[२] पृ. क्र. २२५

सन १९६० नंतरच्या काळात जी. ए. कुलकर्णी, चि. त्र्य. खानोलकर, दिलीप चित्रे, जयवंत दळवी, वसंत फेणे यांची कथा नवीन वळणे घेत झपाट्याने बदलली. त्यांनी आपल्या कथांतून अधिक प्रमाणात व्यक्तिदर्शनाला महत्त्व दिले. वसंत फेणे यांनी व्यक्तीच्या अंतर्विश्वात प्रवेश करुन, त्यांना आपल्या कथेतून मुखर करण्याचा प्रयत्न केला आहे.

"ज्याचा त्याचा क्रूस" आणि "पाणसावल्यांची वसाहत" या दोन कथा संग्रहामध्ये ५० ते ६० व्यक्तिचित्रणांचा समावेश आहे. या दोन्ही कथासंग्रहात व्यक्तीप्रधान कथा समाविष्ट केल्या आहेत. व्यक्तिरेखांचे मनस्वी स्वभाव हे कथांचे वैशिष्ट्य आहे. वसंत फेणे हे घटनेपेक्षा व्यक्तीला जास्त महत्त्व देतात. त्यांच्या कथेतील ही व्यक्तिचित्रणे स्वतःचे असे एक खास वेगळेपण घेऊन आलेले दिसून येतात. त्यांच्या कथेतील व्यक्तिचित्रणे विलक्षण, कर्तबगार, स्वप्नाळूवृत्ती, प्रेमळ, निग्रही, बदफैली, श्रद्धाशील, भावनाशील, अगतिक अशा विविध गुणधर्माच्या व्यक्ती आल्या आहेत.

## "ज्याचा त्याचा क्रूस" या कथासंग्रहातील व्यक्तिचित्रणे

**'करविता धनी'** या कथेमध्ये रहिमतबी, खुशरु व धर्माप्पा या व्यक्तिरेखा येतात. ही कथा रहिमतबी या व्यक्तिचित्रणाभोवती पूर्णपणे गुंफलेली आहे. ती एक कुलशीलवान मुस्लिम घराण्यात वाढलेली स्त्री असून ती दारिद्र्याला कंटाळून तेल गिरणीत नोकरीस लागते. तिथे तिचे गिरणीमालक धर्माप्पाशी अनैतिक संबंध जुळतात. त्यातून ती गर्भार राहते. तिच्या पोटी वाढत असलेले मूल हे मोठे तकदीर घेऊन येत आहे असे तिला वाटते. तसा तिला विश्वासही

असतो. तो विश्वास नवऱ्याला बोलून दाखविताना ती म्हणते, "तुम्हाला सांगितलं ना मी यावेळी, बेटाच होणार. आणि तो तकदीरवाला होणार ! तो जन्मायच्या आधीपासून सबूत मिळू लागलेत! नाही तर एवढं मोठं काम कधी मिळाल होतं."[३] पृ.क.१२ खुदावर अपार श्रध्दा ठेवणाऱ्या, प्रगट आत्मविश्वास असणाऱ्या रहिमतबीचे चित्रण फेणे यांनी केले आहे.

**'प्रश्न चिमूटभरच'** या कथेमध्ये डॉक्टर, त्याची पत्नी, चंद्रशेखर, त्याची पत्नी, बंडोपंत ही व्यक्तिचित्रणे येतात. या कथेतील नायक 'डॉक्टर' ही एक आदर्शतत्वाने जीवन जगणारी व्यक्ती असून, त्याचा मुलगा चंद्रशेखर अमेरिकेत स्थायिक होतो त्यामुळे डॉक्टर निराश होतात. ते आपले इस्पितळ विकून टाकतात. काही कालावधीतच त्यांच्या पत्नीचा मृत्यू होतो. त्यामुळे ते एकटे पडतात. चंद्रशेखर त्यांना अमेरिकेस कायमचे येण्यास विनंती करतो. पण ते साफ नकार देतात. पण त्यांना भारतातील भ्रष्टाचारी जीवनाचे दर्शन होताच ते आपला निर्णय बदलताना सुनेला म्हण्तात, " माझं आयुष्य, या देशात नि या लोकात गेलं ते गेलं; पण आता वाटत, माझी चिमूटभर माती तरी मिसळू नये इथल्या मातीत, गलिच्छ."[४] पृ.क्र.४९

इथे भ्रष्टाचाराचा तिरस्कार करणाऱ्या व वास्तव जीवनाला आपलंस करणाऱ्या डॉक्टरचे चित्रण फेणे यांनी केले आहे.

**'नरनारायण'** या कथेत वामन, वर्षा, गोपू व गद्रे ही व्यक्तिचित्रणे येतात. ही संपूर्ण कथा वामन या व्यक्तिचित्रणाभोवती गुंफलेली आहे. वामन आपल्या पत्नीच्या आजारावर उपचार करण्यासाठी आतोनात कष्ट घेतो. गद्रेच्या साहाय्याने तो नाना महाराजाकडे विभूती आणण्यासाठी जातो. पण महाराज घरी नसल्याने मागे फिरतो. त्यावेळी त्याची गाडी चुकते व त्याला रात्र स्टेशनवरच काढावी लागते. त्यामुळे त्याला मानवी संस्कृतीचा राग येतो. नातीगोती, संस्कृती, भावभावना यामुळे मानवाला त्रास का होतो हे कोडे त्याला पडते. शेवटी त्याला या सर्वातून आपली कधीच सुटका होणार नाही हे अंतिम सत्य त्याला समजते.

माणसाला संस्कृतीमुळे जगणे कसे कठीण होते हे वामन या व्यक्तिरेखेतून फेणे यांनी चित्रित केले आहे.

**'आकाशपुष्प'** या कथेत दिवगी मास्तर, जानकी गुणाकर, संजीवी व उर्मिला ही व्यक्तिचित्रणे येतात. या कथेतील 'दिवगी मास्तर' हे पोस्ट खात्यातून सेवानिवृत्त झालेले असतात. त्यांचा मुलगा वेडा झालेला असतो. मुलग्याच्या वेडाचारामुळे त्यांना इच्छा नसतानाही वडिलोपार्जित जागेत स्थलांतरीत व्हावे लागते. भविष्यात वेडया मुलग्याचा सांभाळ होण्यासाठी आपली सर्व जमीनजुमला मुलगीच्या नावावर करतो पण त्यातही त्याला यश येत नाही. शेवटी तो हताश होतो.

या व्यक्तिचित्रणातून फेणे यांनी कोणत्याही बाप्पाचा मुलगा वेडा, मतिमंद असेल तर त्याला किती दु:ख सहन करावे लागते. त्याचबरोबर दिवगी मास्तरला मुलाविषयी असलेल्या सहानुभूतीचे व चिंतेचे चित्रण केलेले आहे.

**'धर्मसंकट'** या कथेत तोहरा, मसूद, मोहतरम, मूर्तिझा, परवीन या व्यक्तीरेखा येतात. या कथेतील ताहेरा ही मुस्लिम स्त्री. पाश्चात्य संस्कृतीत वाढलेली स्त्री आहे. पण तेहरानमध्ये सत्तांतर होऊन कट्टर इस्लामीवादी खुमेनी राजवट सत्तेवर आल्याने त्यांनी स्त्रीयांचे स्वातंत्र्य हिरावून घेतले. त्यामुळे पाश्चात्य संस्कृतीत वाढलेल्या ताहेराला जगणे असह्य होते. ती नेहमी रितेपणात गुरफटलेली असून ती सतत उदास असते. या व्यक्तिचित्रणातून स्त्रीयांना धर्मातील कडक बंधनामुळे जगणे कसे असह्य होते, याचे चित्रण केले आहे.

**'ज्याचा त्याचा क्रूस'** या कथेत नॉरमन, ॲडम्स, मार्क, विनी, थांडी या व्यक्तिरेखा येतात. या कथेतील नायक 'नॉरमन' ही एक कृष्णवर्णीयांच्या उत्कर्षासाठी संपूर्ण आयुष्य संघर्षमय जीवन जगणारी व्यक्तिरेखा फेणे यांनी या कथेत रेखाटली आहे. पण ज्या कृष्णवर्णीयासाठी तो संघर्ष करतो. त्यांच्यामुळे त्याचा मुलगा आत्महत्या करतो. तेव्हा तो दु:खी होतो व त्याच्या मनात ज्याचे त्याचे मरण त्यांच्या त्यांच्या पाठीवरच्या क्रूसावर असते, असे म्हणतो. शेवटी त्याला कृष्णवर्णीय चळवळ उन्नत करण्यात अपयश येते व तो निराश होतो.

**'अनाकलनीय'** या कथेत दाजी, उमाबाई, कामतकाका व नाथजी या व्यक्तिरेखा येतात. 'नाथजी' ही एक वृद्धाश्रमातील प्रसन्न व समाधानी वृत्तीची व्यक्तिरेखा आहे. त्याच्या लग्नाच्या तिसऱ्या वर्षीच त्याच्या पत्नीचे निधन झालेले असते. त्यामुळे तो एका भावीणबरोबर लग्न न करता राहत असतो. पण काही दिवसांनी ती भावीण त्याला सोडून जाते. त्यामुळे त्याला नाईलाजास्तव वृद्धाश्रमाचा मार्ग धरावा लागतो. या व्यक्तिरेखेतून नामस्मरणाने प्रसन्न व समाधानी बनलेल्या नाथजीचे चित्रण केले आहे.

## ''पाणसावल्यांची वसाहत'' या कथासंग्रहातील व्यक्तिचित्रणे

**'नवी सद्दी येता येता'** या कथेत संजय, संध्या, अशोक, धोंडिबा या व्यक्तिरेखा येतात. या कथेतील 'संध्या' ही नगरसेवक संजयरावची पत्नी असते. ती अतिशय हुशार असते. ती संजयबरोबर लग्न करण्याआधी त्याला त्याचे रक्त तपासून घ्यावयास भाग पाडते. जेंव्हा तिच्या नवऱ्याच्या भाईचा व तिच्या भावाचा पोलिस चकमकीत मृत्यू होतो. तेंव्हा ती संजयरावला गुन्हेगारी प्रवृत्तीतून अलिप्त करुन, त्याला राजकीय पक्षाचा आसरा घेण्यास भाग पाडते. त्यानंतर काही आठवड्यात संजयला एका वेगळ्याच कारणासाठी पोलीस पकडून नेतात. तेंव्हा ती ही धरपकड राजकीय हेतूने प्रेरीत होऊन केलेली आहे, असे जाहीर करते. आणि दोन चारशे महिलांना बरोबर घेऊन रास्ता रोको आंदोलन करते. इथे तिची हुशारी, दक्षपणा व धोरणीपणाचे दर्शन घडते.

**'मागे परतोनी पाहे'** या कथेत रुपा, तिची आई, धनू, वडील, दादा, ताई इत्यादी व्यक्तिचित्रणे येतात. इथे फेणे यांनी वृद्ध आईच्या तरुणपणीच्या देहाचे उत्कृष्ट वर्णन केले आहे.

''तरुणपणी मी किती सुंदर दिसत होते! आता पेक्षाही वर्ण किती तरी सतेज होता. वर्ण सुंदर, चेहरा सुंदर, तुला माहिताहे माझे हातही कसे नितळ होते. पोटऱ्या देखील वेरुळ अजंठातल्या चित्रातील बायकांच्या आहेत तशा आकाराच्या माझ्या आण्णांनी

म्हणजे वडिलांनी प्रयत्न केला असता तर चांगल्या श्रीमंत नि घरंदाज घरात पडले असते मी''[५]पृ.क्र. ५१

या कथेतील आईला हे घर पसंद नसतानाही तिच्या आण्णाच्या आग्रहामुळे ती लग्न करुन घेते. या व्यक्तिरेखेतून फेणे यांनी स्त्रीच्या सोशिक वृत्तीचे चित्रण केले आहे.

**'अल्याड-पल्याड '** या कथेत जयंत, पकंज, पराग, पद्मा, एस. आर. ही व्यक्तिचित्रणे येतात. या कथेतील 'पकंज' हा जयंतचा सख्खा भाऊ असतो. जयंतच्या पत्नीचा मृत्यू झाल्यावर तो जयंतच्या संपत्तीवर डोळा ठेवून त्याच्या फ्लॅटवर कब्जा करतो. तसेच तो जयंतचा फ्लॅट स्वत:च्या नावावर करुन घेतो आणि योग्य संधी मिळताच जयंतला वेडा ठरवून त्याला कायमचे वेड्याच्या इस्पितळामध्ये दाखल करतो. फेणे यांनी य व्यक्तिरेखेतून मानवी स्वार्थी वृत्तीचे चित्रण केले आहे.

**'कल्पांतकालीन काही क्षण'** या कथेतील 'दमित्री' ही प्रमुख व्यक्तिरेखा आहे. या व्यक्तिरेखेतून त्यांच्या अंतर्मनाचे व दु:खाचे चित्रण फेणे यांनी केले आहे. तो सेनादलात सैनिक असतो. तो दुसऱ्या महायुद्धात रशियन सैनिक म्हणून जर्मनीविरुद्धच्या लढ्यात सहभागी होतो. त्यात तो जखमी होतो. युद्ध संपल्यानंतर तो सेवानिवृत्त होतो. त्यानंतर मात्र त्याच्या वाटेला दु:खी जीवन येते. त्याच कालावधीमध्ये सोविएत संघराज्यामध्ये फूट पडते. तेंव्हा त्याला रशियन म्हणून जार्जियातून हाकलून दिले जाते. त्यात त्याचा मुलगा कायमचा परागंदा होतो. त्याची नात गुंड पळवून नेतात. त्यामुळे तो अतिशय दु:खी होतो. शेवटी त्याला निर्वासित म्हणून एक गाव मिळते. पण त्या गावात त्याला हक्काचे घर व त्याच्या सुनेला नोकरी मिळत नाही. त्यामुळे तो हताश होतो. एका युद्धवारुची शोकांतिका फेणे यांनी दंमित्री या व्यक्तिरेखेतून चित्रित केली आहे.

**'पैसाची पोकळी'** या कथेत 'सरोजाबाई' ही प्रमुख व्यक्तिरेखा आहे. वृद्धत्वामुळे व नवऱ्याच्या मृत्यूमुळे एकाकीपणाचे जीवन तिच्या वाट्याला आलेले आहे. तिच्या देहाचे वर्णन फेणे यांनी उत्कृष्टपणे केले आहे. ''सुरेख नक्षिची उबदार शाल पांघरावी तसं बाईंनी वार्धक्य पांघरुन घेतलं होतं. केतकीची डूब असलेलं गौरवर्ण, चेहरा, मान, दंड यांच्यात वयामुळं

आलेला सैलपणाही नितळ पश्चिम क्षितीजावरील निरभ्र सायंकालीन आकाशाच्या सालीनं जणू त्यांची त्वचा घडविली होती."[६] पृ. क्र. १११ इथे लेखकांनी सरोजबाईच्या वृद्धत्वाचे चित्रण अगदी हूबेहूब केल्याने सरोजबाई ही व्यक्तिरेखा वाचकांच्या डोळ्यासमोर उभी राहते.

**'शोध आणि बोध'** या कथेत विद्याताई , बाबूराव, भाई, रामभाऊ, शेवंताबाई बाबासाहेब ही व्यक़्तिचित्रणे येतात. या कथेतील 'रामभाऊ' ही व्यक्तिरेखा बदफैली स्वभावाची रंगविली आहे. ज्यावेळी त्याच्या भावाचा मृत्यू होतो तेंव्हा मात्र परंपरागत सावकारकीचा कारभार त्याच्याकडे येतो. तो शेवंता बाईकडे कर्जाची वसुली करण्यासाठी जातो व तिला दरमहा दहा रुपये परत करण्यास सांगतो. तेंव्हा ती त्याला अशक्य आहे असे म्हणते, तेंव्हा तो तिला म्हणतो, "दरमहा दहा रुपये मिळाले अशी आपण पावती देऊ. त्या वयस्क शेठजीला देता ते मला द्या. महिन्यातून तीन चार वेळा बुवा."[७] पृ. क्र. १३९

इथे फेणे यांनी रामभाऊच्या वासनांध स्वभावाचे चित्रण केले आहे.

**'बर कां मुलांनो'** या कथेतील पंत व कृष्णभट या व्यक्तिरेखा अतिशय महत्त्वाच्या आहेत. पंत ही एक विलक्षण व्यक्तिमत्व असणारी व्यक्तिरेखा आहे. तसेच या कथेत कृष्णभटाच्या अगतिक वृत्तीचे दर्शन घडते. मुळात कृष्णभट हा कुळाचार करुन जीवन जगत असतो. त्याच्यावर तरुण विधवेचा हात धरल्याचा खोटा आरोप आलेला असतो. त्यामुळे तो गाव सोडून वाडीला आलेला असतो आणि तेथेच त्याला अखंड बेवारशाचं आयुष्य कठावं लागते. त्यातच त्याची अगातिकता दिसून येते.

अशाप्रकारे फेणे यांनी आपल्या "ज्याचा त्याचा क्रूस" आणि "पाणसावल्यांची वसाहत" या कथासंग्रहातील कथांतून व्यक्तिचित्रणांची मांडणी करुन त्यातून मानवी स्वभावाचे, त्यांच्या भावभावनांचे व त्यांच्या वृत्तीचे चित्रण केले आहे.

## प्रसंगनिर्मिती-

कथेच्या निरनिराळ्या अंगापैकी प्रसंगनिर्मिती हे एक महत्त्वाचे अंग आहे. कथेतून काही तरी घडत असते. किंवा कोणाकडून तरी घडविले जाते. कथानकाचा सांगाडा मुख्यत:

निरनिराळ्या प्रसंगातून आवश्यक तो आकार घेत असतो. कुठली तरी कृती होते किंवा कृती करविली जाते. त्या पाठीमागे कार्यकारणाचे संबंध असतात. हे संबंध प्रसंग चित्रणातून उलगडले जातात. त्यातून कथेतील व्यक्तीवर प्रकाश टाकला जातो. विशिष्ट प्रसंग विशिष्ट तऱ्हेने चित्रित करण्यात लेखकाचा दृष्टिकोन प्रकट होत असतो.

सामान्यतः प्रसंगचित्रण हे वास्तव अनुभवावर आधारलेले असते. वसंत नरहर फेणे यांच्या ''ज्याचा त्याचा क्रूस'' आणि ''पाणसावल्याची वसाहत'' या दोन्ही कथासंग्रहात उत्कृष्ट अशी प्रसंग निर्मिती केलेली आहे. त्यांच्या या कथासंग्रहातील कथांतील प्रसंग हे मानवी जीवनातील वास्तव साकार करतात. मानवी जीवनातील सुख-दुःखाचे, व्यथा-वेदनांच्या प्रसंगाचे चित्रण त्यांनी आपल्या कथातून केले आहे.

## ''ज्याचा त्याचा क्रूस'' मधील कथांचे एक दोन प्रसंग

**'करविता धनी'** या कथेतील रहिमतबीला अनैतिक संबंधातून दिवस गेलेले असतात. याची कल्पना तिच्या नवऱ्यालाही नसते. ही कल्पना फक्त तिलाच असते ही गोष्ट प्रथम ज्याच्याशी आपण अनैतिक संबंध ठेवले. त्या धर्माप्पाला सांगणे तिला गरजेचे वाटते. तो प्रसंग लेखकांनी हळूवारपणे रंगविला आहे.

''सांगते काय, तिनं हसऱ्या चेहऱ्यानं धर्माप्पाकडं पाहून म्हटलं. 'आता माझ्या उदरी वाढतं ते मूल तुमचच आहे !' अन् क्षणभर थांबून त्याला बजावल्याप्रमाणं काहीशा मिष्कील आवाजात म्हणाली. 'दोन महिन्याच झालय ते आता'

धर्माप्पा चेष्टेखोर स्वरात बोलून गेला. 'वा: !'

माझंच कशावरुन? त्याचक्षणाला तिचा चेहरा एकदम पडला. अत्यंत मर्यादेशील पण काकुळतीला आल्यागत ती म्हणाली, 'कशावरुन म्हणजे ?' त्याचक्षणाला तिचा चेहरा एकदम पडला. अत्यंत मर्यादशील पण काकुळतीला आल्यागत ती म्हणाली, कशावरुन म्हणजे ? मी म्हणते म्हणून! माझ्या देवाशी मी खोटं बोलेन ?''[८] पृ. क्र. ७

या प्रसंगातून रहिमतबीला अनैतिक संबंधातून होणारे मूल हे तुमचेच आहे हे धर्माप्पाला सांगताना तिच्या मनात निर्माण झालेल्या भीतीचे चित्रण केले आहे.

**'प्रश्न चिमूटभरच'** या कथेत वृद्ध असलेल्या डॉक्टरांच्या मुलग्याचा अमेरिकेत किडणीचा आजार होऊन मृत्यू होतो. तेंव्हा डॉक्टरांच्या वाटेला जे दु:ख येते त्या प्रसंगाचे चित्रण मनाला चटका लावणारे आहे.

''डॉक्टरांना आपण लुळे पडल्यागत वाटू लागलं. निर्बुद्ध गेंगाण्यानं काही शहाणपणा करुन त्यांच्या नातेवाईकांना बोलावून आणलं. आणि त्यांच्या नात्यात नि परिचितांत डॉक्टरावर या वयात पडलेल्या घाल्याची बातमी पसरली. डॉक्टरांची स्थिती चमत्कारीक झाली होती. प्रयत्न करुनही ते स्वत:ला सावरु शकले नव्हते. मध्येच जेंव्हा काहीक्षण ते सावचित होत तेंव्हा त्यांना मोठं नवल वाटे. आपल्या जीवाच्या अविभाज्य भाग बनलेल्या बाई गेल्या तेंव्हा आपला तोलच गेला. आपण स्वत:ला अधुरे अपुरे वाटू लागलो आणि ज्या मुलाबद्दल दु:स्वास म्हणावा इतका दुरावा वाटत होता. ज्याची आठवण संतापाशिवाय गेली कित्येक वर्ष झाली नाही. जो जन्माला आला नसता तर बरं झालं असतं असही वाटलं होतं. तो गेल्यावर काळजाचा तुकडा तोडल्यागत वाटतं. बाई गेल्या तेंव्हाही हे असं झालं नव्हतं! हे असं कसं ?''[१] पृ. क्र. ४२.

या कथेत डॉक्टरांच्या इच्छेविरुद्ध त्यांचा मुलगा अमेरिकेत स्थायिक झालेला होता. त्यामुळे डॉक्टरांच्या मनात त्याच्याबद्दल चिड निर्माण झालेली होती. पण त्याचा किडणीच्या आजाराने मृत्यू झाल्याची बातमी डॉक्टरांना समजताच त्यांना जे दु:ख होते त्या दु:खदायक घटनेतून दु:खाची प्रसंगनिर्मिती फेणे यांनी साधलेली आहे.

**''ज्याचा त्याचा क्रूस''** या कथासंग्रहातील प्रत्येक कथेत वसंत नरहर फेणे यांनी उत्कृष्ट प्रसंग निर्मिती केलेली आहे. 'नरनारायण'मध्ये वामनची गाडी चुकल्यामुळे त्याच्यावर संपूर्ण रात्र स्टेशनवर काढण्याचा आलेला प्रसंग, 'आकाशपुष्प' या कथेमध्ये वेड्या मुलाचा बाप्पा समोर विहीरीत पडून झालेल्या मृत्यूचा प्रसंग, 'धर्मसंकट' या कथेत बदफैली ठरलेल्या परवीनला जमावाने दगडाने ठेचून मारले तो प्रसंग. व 'ज्याचा त्याचा क्रूस' या शीर्षक कथेत

विनीवर बलात्कार करुन तिचे तुकडे तुकडे करुन फेकून दिल्याचा प्रसंग मनाला हादरवून सोडणारा आहे. असे अनेक प्रसंग 'ज्याचा त्याचा क्रूस' या कथासंग्रहात आलेले आहेत.

## **''पाणसावल्यांची वसाहत'' या कथासंग्रहातील कथांतील प्रसंगचित्रण पुढीलप्रमाणे :**

**'नवी सद्दी येता येता'** या कथेत नगरसेवक संजयरावावर पूर्व-वैमन्यासातून गोळ्यांचा वर्षाव झाल्याने त्याचा जागीच मृत्यू होतो. ही बातमी जबाबदार व्यक्ती संध्याला सांगताना जो उत्कंठावर्धक प्रसंग निर्माण होतो त्याचे चित्रण.

'उभ्या राहिलेल्या माणसांना संध्याताई विचारते, ''काय हो काय झालं तुम्ही असे.''

जबाबदार माणूस धैर्य गोळा करुन म्हणेल, ''संध्या. ताई तुम्हाला इस्पितळात यावं.''

''काय हो काय झालं तुम्ही असे''

जबाबदार माणूस धर्म गोळा करुन म्हणेल, ''संध्याताई तुम्हाला इस्पितळात यावं.''

'काय?' संध्याताई मध्येच विचारतील 'काय झालं ? ''म्हणजे काय -कॉर्पोरेटर जरा सीरीयस.......''

''कार्पोरेटर !'' संध्याताई विस्कारल्या डोळ्यांनी उद्गारतील. दोन क्षण त्याचं तोंड उघडंच राहील. मग त्या विचारतील, ''म्हणजे काय ? हार्ट.''

नाही टॅक्सीत त्यांच्यावर कुणी गोळी ? बाकीच्यातले दोघं मानाखाली घालून तिरप्या दृष्टीनं संध्या ताईची प्रतिक्रिया (कुतूहलपूर्वक) न्याहाळू लागतील.

संध्याताईच्या ते लक्षात येईल. त्या जबाबदार माणसाला त्याच्या मुलांची शपथ घालून विचारतील, ''खरं सांगा, कार्पोरेटर आहेत का .....? '' त्यांचा प्रश्न अर्ध्यावरच तुटेल.''[१०] पृ. क्र. ३५ या प्रसंगातून संजयरावच्या पत्नीला तिच्या पतीचा खून झाल्याची बातमी कशाप्रकारे समजू शकेल व तिची प्रतिक्रिया व आवस्था कशी होईल याचे अगदी हुबेहूब चित्रण वसंत फेणे यांनी केले आहे. घटनेला पुरक अशी प्रसंग निर्मिती करुन फेणे, कथा वजनदार घाटीव बनवितात.

**'कल्पांतकालीन काही क्षण'** या कथेतील रशियन सैनिक म्हणून निवृत्त झालेल्या दमित्रीला सोविएत संघराज्यात फूट पडल्यानंतर त्याला जार्जियातून हाकलून देण्यात आले. त्याचबरोबर जार्जियातील गुंडानी त्याच्या कुटुंबावर हल्ला केला. त्या हल्ल्यात त्याची नात तात्याना हिला ते गूंड पळवून नेतात. तो प्रसंग फेणे यांनी उत्कृष्टपणे चित्रित केला आहे.

''सांगितलं ना, तात्यानाला ते ओढू लागले. तेंव्हा मीच आधी 'अरे हे काय चालवलय तुम्ही ' म्हणत पुढे गेलो तर एकानं मला दूर सारलं मी त्यांच्यावर तुटून पडतो. तर दोन्ही हातानं धरुन त्यानं मला इतक्या जोरात ढकललं की माझं शरीर गर्ररदिशी फिरलं आणि माझं डोकं भिंतीवर आपटलं माझी सून एकीकडं मदतीसाठी टाहो फोडत त्यांना प्रतिकार करीत होती. बिचारी माझी नात...... माझी सोळा वर्षाची फुलकळी ती त्यांना चावत ओरबाडत होती. पण दोघा धाटिंगणानी माझ्या सूनेलाच उचललं आणि जमिनीवर आपटलं. तोवर दुसऱ्या दोघांनी तात्यांनाला सरळ उचलून बाहेर नेलं, तिथं उभ्या असलेल्या एका टेंपोत तिला टाकलं; दोघेही आत शिरले. त्यांनी दार लावलं. मग माझ्या सूनेला आपटणारे ते मात्रागमनी गुंड ड्रायव्हर केबिनमध्ये शिरले. माझी सून व मी धडपडत बाहेर येत मदतीसाठी ओरडत होतो. लोकांचा प्रतिसाद शुन्य होता! आणि ते टेंपो चालू करुन रुबाबात चालू पडले होते. पाच धिप्पाड दैत्यापुढे आम्हा दोघाचं काय चालणार.''[११] पृ. क्र. १०१, १०२

या प्रसंगातून गुंडप्रवृत्तीच्या माणसाच्या अघोरीवृत्तीचे व दमित्रीच्या वेदनामय दु:खाचे करुण चित्रण फेणे यांनी केले आहे.

त्याचबरोबर 'अल्याड-पल्याड' या कथेमध्ये जयंतला त्याच्या भावाने व भावजयीने वेड्याच्या इस्पितळात चलाखीने दाखल केले. हे त्याला समजताच व तेथील कर्मचारी वेड्यांची कपडे घालण्यासाठी त्याला नेताना त्याने केलेल्या आरडा ओरडाचा प्रसंग आणि 'शोध आणि बोध' या कथेत कृष्णभरावर आलेला खोटा आरोप असे अनेक प्रसंग ''पाणसावल्यांची वसाहत'' या कथासंग्रहात आले आहेत.

## वातावरण निर्मिती

कथासंग्रहामध्ये वातावरण निर्मितीला खूप महत्त्व आहे. कथांमधील आशय व्यक्त करताना त्या आशयाला साजेशे असे वातावरण निर्माण करणे गरजेचे असते. आणि त्यामुळेच कथा कादंबरीमधून वातावरणाचा उपयोग केला जातो. त्याच्यातूनच पुढे कथेमध्ये काय घडणार आहे याची जाणीव होते. वातावरणनिर्मितीमुळे कथा त्यातील आशय आणि त्याचा होणारा अविष्कार यामध्ये सुसूत्रता प्राप्त होते. कथामध्ये घटना, व्यक्ती जशा आवश्यक आहेत. त्याचप्रमाणे कथेला सजीवता प्राप्त करुन देण्यासाठी वातावरण निर्मितीचा खूप मोठा वाटा आहे. या संदर्भात वा. ल. कुलकर्णी म्हणतात, ''कोणत्याही विशिष्ट भूप्रदेशात विशिष्ट काळाच्या पार्श्वभूमीवर घटना, प्रसंग घडत असतात. हे स्थळ काळाचे उचित दर्शन घडविणे म्हणजे पार्श्वभूमी किंवा वातावरण निर्मिती होय.''[१२] पृ. क्र.५

घटना प्रसंग चित्रित करीत असताना ती प्रभावीपणे चित्रित करण्यासाठी वातावरण निर्मिती केली जाते. तेंव्हा त्या घटनेला महत्त्व प्राप्त होते. कथेमध्ये येणाऱ्या चित्रणाला भरीव स्वरुप येण्यासाठी व कथा उठावदार बनविण्यासाठी वातावरण निर्मिती करणे अत्यंत महत्त्वाचे असते. वातावरण निर्मितीमुळे कथेला सौदर्य प्राप्त होते. घटना, प्रसंग, व्यक्तीचे स्वभाव त्याद्वारे समजून येतात.

वसंत नरहर फेणे यांनी आपल्या कथांमध्ये प्रसंगनिर्मिती करत असताना उत्कृष्टप्रकारे वातावरणनिर्मिती केलेली आहे. त्यांच्या ''ज्यांचा त्याचा क्रूस'' व ''पाणसावल्यांची वसाहत'' या दोन्ही कथासंग्रहातील कथांना वातावरणनिर्मितीमुळे सौंदर्य प्राप्त झाले आहे.

**''ज्याचा त्याचा क्रूस''** या कथासंग्रहातील **'करविता धनी'** या पहिल्याच कथेची सुरुवात वातावरण निर्मितीने साधलेली आहे.

'एकोणीसशे छप्पनचा मे महिना. दुपारचा एकचा सुमार. अंगाची लाही लाही करणारी तल्खली सभोर फुलून आली होती. कुठतरी सावलीत गपगार पडून रहावं असं साऱ्या मोमिनपुऱ्याला वाटत होतं. वस्तीला भिडणाऱ्या वाटेवरच्या कोपऱ्यावरील झाडाखाली पडलेल्या कुत्र्यासारखं किंवा समोर साकळल्या गटारीच्या कडेला पसरलेल्या डुकरिणीसारखं

तरी दुपारच्या जेवणाखाणानंतरचे न चुकणारे व्यवहार चालू होते ओढून काढल्यासारखे. नि त्यावर ग्लानीचा जणू तवंग चढला होता.''[१३] पृ. क्र. १

असे कथेच्या सुरुवातीसच वातावरण निर्मिती करुन कथेचा विकास साधलेला आहे. त्यातून कथेतील पात्रांचा प्रवेश उन्हाच्या तल्खलीत, रखरखत्या उन्हात होतो हे या वातावरणातून वाचकाला समजते.

त्याच्या **''ज्याचा त्याचा क्रूस''** व **''पाणसावल्यांची वसाहत''** या दोन्ही कथासंग्रहातील बहुतांशी कथेची सुरुवात वातावरण निर्मितीने साधलेली आहे. 'जन्माला येते वेळीच माणसाच्या मानगुटीवर एक हडळ स्वार झालेली असते.' (नर नारायण) 'इसवीसन एकोणीसशे पंच्याऐंशीचा उत्तरार्ध नुकताच सुरु झाला होता.' (धर्मसंकट) 'एकोणीसशे नव्वद फेब्रूवारीची सुरुवात'(ज्याचा त्याचा क्रूस) 'वार्धक्यातील रिकामपणासारखी कंटाळवाणी दुपार वृध्दाश्रमातील आवारात पसरली होती' (अनाकलनीय) 'एक गोष्ट माझ्या चटकन लक्षात आली' (अल्याड-पल्याड) 'काळ तर मोठा विचित्र आला होता' (कल्पांनकालीन काही क्षण) 'समोरच्या चार पाच भूखंडात इमारती आकारास लागल्यात' (पैसाची पोकळी) अशा एखाद्या वाक्यातून वातावरणनिर्मिती साधून कथेची सुरुवात होते.

काही वेळा एखादया स्थळाचे निवेदन करण्यात लेखक जेव्हा गुंतून जातो. तेव्हा उत्कृ ष्ट प्रकारची वातावरण निर्मिती साधण्यात लेखक यशस्वी झाल्याचे दिसते. ''ज्याचा त्याचा क्रूस'' या कथासंग्रहातील 'आकाशपुष्प' या कथेमध्ये वेडया मुलाच्या ओरडण्याने तेथील चाळीतील लोकांना त्रास होतो तेव्हा घर मालकाने चाळ खाली करावयास सांगितल्याने दिवगी मास्तर कुटुंबासह वडिलोपार्जित जागेत राहायला येतो.

''घरच्या पायऱ्या तीनच. त्याही बसकुऱ्या. उत्तराभिमुख. घराची बाहेरची ओसरी लाकडी गजांनी बंद केलेली. ओसरीला लागून मधली खोली माजघर. माजघराच्या उजव्याअंगाला एक लहाणसं कुड. मधल्या खोलीच्या पलिकडे लांबच लांब पडवी वजा स्वयंपाक घर. एका बाजूला मोठा चौरंग, त्यावर देव्हारा आणि देवघराची मर्यादा सांगणारा सागवानाचा दीड दोन फूट उंचीचा कठडा चौरंगाच्या काही अंतरावर. आत जाण्यासाठी

त्याला मधोमध वाट. दुसऱ्या टोकाला म्हणजे पूर्वेला दोन तीन चुली व तेवढ्याच वायलांचं चुलाण. स्वयंपाक घराच्या मधोमध मागील दार. त्या दारातून सरळ चार ढेंगावर 'आ' वासून बसलेली विहीरं. रुढ गोड पाण्याची. उजवीकडे न्हाणी.''[१४] पृ. क्र. ७८.

या वर्णनतून ती वास्तू वाचकांच्या डोळ्यासमोर उभी राहते इतके सुरेख वातावरण फेणे यांनी निर्माण केले आहे.

'धर्मसंकट' या कथेत बदफैली ठरलेल्या परवीनच्या मृत्यूची भीषणता फेणे यांनी ह्द्यद्रावक वातावरणातून व्यक्त केली आहे.

''बघ्यांच्यातून हर्षध्वनी, टाळ्या नि पासदरांना उत्तेजक नारे सुरु झाले. पासदरांना आवेश चढला. डोळ्यातून खून तोंडात धर्मविजयाच्या घोषणा अन हातात कंगोरेदार दगड. नेम धरुन ते परवीनवर दगडाचा जोरदार मारा करीत होते. तिची 'चादोर' ठिकठिकाणी फाटली होती. ती रक्तानं थबथबली. बांधल्या ठिकाणीच परवीन निकरानं हात पाय झाडून सुटकेसाठी तडफडत होती. तिचे गाल, हनुवटी व चादोर सुटल्या-फाटल्यामुळे दिसणारा उजवा स्तन यातून वाहत्या रक्ताबरोबरच लोंबणारं मांस दिसू लागलं होतं.''[१५] पृ. क्र. १०४

या वर्णनातून ही घटना आपल्या समोरच घडत आहे असे वाचकांना वाटते.

''पाणसावल्यांची वसाहत'' या कथासंग्रहातील 'नवी सद्दी येता येता' या कथेत राजकीय व्यक्तीच्या मनातील कपट वृत्तीचे दर्शन फेणे यांनी उत्कृष्ट वातावरणातून रेखाटले आहे.

''काही बुजुर्गांना तो विनयशीलपण भेटला. नंतर जमलेल्या कार्यकर्त्यांपैकी याची फिरकी घे. त्याची चेष्ठा कर, कुणाच्या खांद्यावर हात ठेव. तर कुणाच्या पाठीत बुक्का मार असं सहजगत्या केलं. मात्र तसं करताना त्याच्या मनात पक्का हिशेब होता. ज्यांच्याशी विशेष सलगी दर्शविली, ते कार्यकर्ते बिनीचे होते किंवा ते पक्षातील त्याच्या किंवा त्याच्याहून वरच्या श्रेणीच्या पुढाऱ्यांचे पित्ते होते.'' [१६] पृ. क्र. १८.

या वर्णनातून राजकीय व्यक्तीच्या ढोंगी लंपट वृत्तीचे दर्शन वाचकाला घडते. '

'पैसाची पोकळी' या कथेतील नायिका सरोजाबाई हिच्या नातीला अमेरिकेत मुलगा होतो. तेव्हा पणतू झाल्याचा आनंदोत्सव व्यक्त होत असताना फेणे यांनी उत्कृष्ट वातावरण निर्मिती केली आहे.

"या उत्सवाची उर्मी पल्याडनं आलीय, सागर ओलांडत, महासागर ओलांडत, जमीन, डोंगर दऱ्या, रानं वनं, नद्या, नाले, खाड्या ओलांडत आलीय. येताना त्या पैसाच्या पोकळीतूनही आलीय. त्या पोकळीतील आभाळाचं अंत:करण उत्सवानं तुडुंब भरीत आलीय. पैसाची पोकळी भरुन मगच आपल्या शरीरात उत्सव मांडायला आलीय, शाश्वत कोंबाचा हुंकार घेऊन आलीय."[१७] पृ. क्र. १२०.

या वर्णनातून सरोजाबाईंना पणतू झाल्याची बातमी मिळताच हा आनंदोत्सव कसा सागर, महासागर, खाड्या, नद्या, नाल्या, दऱ्या ओलांडून अमेरिकेतून भारतात येत आहे. तसेच तो पैसाची पोकळी भरुन काढण्यासाठीच आलेला आहे हे वाचकाला या वातावरण निर्मितीतून कळते.

अशाप्रकारे वसंत नरहर फेणे यांनी आपल्या "ज्याचा त्याचा क्रूस" व "पाणसावल्यांची वसाहत" या दोन्ही कथासंग्रहातील सर्वच कथामध्ये. प्रसंगाला साजेल अशाप्रकारची वातावरण निर्मिती करुन कथेचा हेतू साधण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला आहे.

## आशय जाणिवा

कथालेखनामध्ये आशय जाणिवेला अतिशय महत्त्व असते. कथेत आशयजाणिवा नसतील तर कथेला काहीच अर्थ उरत नाही. कथेमध्ये आशय जाणिवा असतील तरच कथा वाचकांच्या मनाला भेदू शकते; ती चिरकाल वाचकाच्या स्मरणात राहू शकते. वाचकांवर एक वेगळाच ठसा उमटवू शकते. त्यामुळे लेखक कथेमध्ये आशयजाणिवेला अतिशय महत्त्व देतो.

वसंत नरहर फेणे यांनी **"ज्यांचा त्याचा क्रूस" व "पाणसावल्यांची वसाहत"** या दोन्ही कथासंग्रहात माणसाच्या व्यथा-यातना, वृध्दांच्या समस्या, त्यांचे दु:ख, महानगरीय जीवन, मध्यमवर्गीय जीवन, परदेशी जीवन, राजकीय जीवन, राजकीय ताणतणाव, मानवी

स्वार्थीवृत्ती असे वेगवेगळे आशय घेतले आहेत. त्याचबरोबर त्यांनी 'नवी सद्दी येता येता', 'मागे परतोनी पाहे ', 'नरनारायण' या कथेतील आशय मुंबईसारख्या शहरातून घेतलेले आहेत तसेच 'धर्मसंकट', 'ज्यांचा त्याचा क्रूस' 'कल्पांतकालीन काही क्षण' या कथा परदेशी वातावरणातून घेतलेल्या आहेत. 'पैसाची पोकळी', 'प्रश्न चिमूटभरच' या दोन्ही कथेत प्रमुख पात्रे मुंबई शहरातील दाखवले असून त्यांचे नातेवाईक हे अमेरिकेत स्थायिक असलेले दाखविले आहे. एकंदरित फेणे यांनी कथेचे आशय शहरी व परदेशी जीवनातून घेतलेले आहेत.

त्यांनी आपल्या कथेतील आशयामध्ये अनेक नवनवीन जाणिवा मांडलेल्या आहेत. त्यामध्ये **स्वातंत्र्यविषयक, आरोग्यविषयक, समाजविषयक, धर्मविषयक, राजकारणविषयक, वृद्धत्वविषयक** यासारख्या अनेक जाणिवा त्यांच्या कथेत येतात.

**'धर्मसंकट'** या कथेतील आशयामध्ये शाह राजवटीविरुद्ध बंड करुन कट्टर इस्लामीवादी खुमेनी राजवट सत्तेवर येते. या राजवटीने सर्वसामान्यावर धर्माची अनेक बंधने घातलेली असतात. त्यामुळे ही राजवट सर्वसामान्य मध्यमवर्गीय लोकांना जाचक ठरते. त्यातच पाश्चात्य शिक्षण घेतलेल्या व सरकारी कचेरीत टायपिस्ट असलेल्या परवीनचा हकनाक बळी जातो. त्यामुळे लोकांच्या मनात एक प्रकारची भीती निर्माण झालेली असते. त्यांना ही हुकुमशाही गाजवत असलेली राजवट नष्ट व्हावी असे वाटत असते. पण सरळ सरळ या राजवटीला विरोध करणे म्हणजे स्वत:हून मृत्यूला सामोरे जाण्यासारखे होते. तेंव्हा या राजवटीला उलथवून स्वातंत्र्य मिळविण्यासाठी 'फिदाय गेरीला' या संघटनेच्या मुली प्रयत्न करतात. पण त्यांना त्यात यश येत नाही. त्या धर्मरक्षकांच्या हाती सापडतात, व त्यांना जमावामार्फत ठेचून मारले जाते. या कथेत फेणे यांनी स्वातंत्र्यविषयक जाणिवा स्पष्ट केली आहे. 'ज्याचा त्याचा क्रूस' या शीर्षक कथेतही स्वातंत्र्य विषयक जाणिवा स्पष्ट होते. तसेच 'अनाकलनीय' या कथेत वृद्धत्व विषयक जाणिवा स्पष्ट केली आहे.

त्यांनी **'नवी सद्दी येता येता'** या कथेत भाईगिरी टोळीत सामील झालेल्या संजयरावला संध्या आवडू लागते. तेंव्हा तो तिला लग्नाची मागणी घालतो पण ती अतिशय दक्ष

असते, ती त्याला सरळ सरळ रक्त तपासल्याशिवाय तुझ्याशी लग्न करणार नाही असे सांगते. तेंव्हा त्याने कारण विचारल्यावर ती स्पष्ट करते की 'त्याला एडसची लागण झालेली आहे की नाही, पहिल्यांदा पहावं लागेल.' यातून फेणे यांनी या कथेत आरोग्यविषयक जाणिवा स्पष्ट केली आहे. त्याचबरोबर त्यांनी शोध आणि बोध या कथेतही आरोग्यविषयक जाणीवा स्पष्ट केली आहे.

'मागे परतोनी पाहे,' या कथेत रुपा विधीवत लग्न न करता धनूबरोबर सहजीवन व्यथीत करण्याचा निर्णय घेते. तेंव्हा तिची आई, वडील, भाऊ, ताई व वहिणी यांना समाज काय म्हणेल ? याची भीती वाटत असते. त्यामुळे ते सर्वजण रुपाला अतिशय समजावण्याचा प्रयत्न करतात. या कथेत फेणे यांनी समाजविषयक जाणिवा स्पष्ट केली आहे.

वसंत नरहर फेणे यांनी आपल्या कथेतील आशय जाणिवेतून वाचकांना एक प्रकारे बोधच दिलेला दिसून येतो.

## भाषिक वैशिष्ट्ये

साहित्यकृतीच्या आकलन व मुल्यमापनासाठी त्या साहित्यकृतीची भाषा आणि भाषिक वैशिष्ट्ये यांचा विचार प्रथम करावा लागतो. संदेशवहनाचे भाषेचे प्राथमिक कार्य संपल्यानंतर मग साहित्यामध्ये भाषेचे कार्य सुरु होते. साहित्यकृतीमध्ये ही भाषा कधी साहित्याचे माध्यम म्हणून येते तर कधी ती साधन म्हणून येते. साहित्यामध्ये भाषेचा नानाविध प्रकारांनी उपयोग चालू असतो. साहित्यातील भाषेला एक आंतरिक रचनातत्व असते. वाचकावर विशिष्ट परिणाम साधण्यासाठी विशिष्ट भाषिक रुपांची रचना लेखक मुद्दामच करीत असतो. तसेच अनुभवाची प्रचिती देणे हे साहित्यिकांचे मुख्य काम असते. ही अनुभवाची प्रचिती साहित्यक आपल्या कृतीतून, भाषेद्वारे, निवेदनातून, स्पष्टीकरणातून,विवरणातून करीत असतो. कधी कधी ती अनपेक्षित अर्थ व्यक्त करते. तर कधी नियमोल्लघंन करुन शब्दांची मोडतोड करतो. भाषेचे नियमोल्लंघन हे त्या त्या लेखकाची एक शैली असते. नियमोल्लघंन आणि शब्दांची मोडतोड म्हणजे भाषेत केलेले प्रयोग असतात. याविषयी भालचंद्र नेमाडे

म्हणतात, "साहित्यिक भाषेत ध्वनी, मात्रा, हेल, शब्दरचना, शब्दक्रम, वाक्यरचना, ओळी, कडवी ह्या सर्वच स्तरावर नवनव्या रचना अपेक्षित असतात. ह्या भाषिक प्रयोगामधूनच अर्थाचे नवनवे पदर प्रकट होतात. आणि भाषेला पुरोगामी करण्यात साहित्यिकाला यश येते."[१८] पृ. क्र. १६

वसंत नरहर फेणे यांनी "ज्याचा त्याचा क्रूस" व "पाणसावल्यांची वसाहत" या दोन्ही कथासंग्रहात महानगरीय भाषेचा वापर करुन देशातील व परदेशातील नवीन विचारांची देवाण घेवाण केलेली आहे. तसेच या दोन्ही कथासंग्रहात इंग्रजी भाषेचा वेळोवेळी वापर केलेला आहे. त्यामुळे त्यांच्या कथासंग्रहांना वाङ्‌मयीन महत्त्व प्राप्त झाले आहे. अशा या त्यांच्या "ज्याचा त्याचा क्रूस" व "पाणसावल्यांची वसाहत" या कथासंग्रहाची भाषिक वैशिष्ट्ये पाहणे अत्यंत आवश्यक आहे. फेणे यांच्या कथांची भाषिक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे :

## भाषाशैली

वसंत नरहर फेणे यांची भाषाशैली साधी सोपी सरळ आहे, तसेच त्यांची भाषा आकर्षक आहे. त्यामध्ये त्यांनी अलंकार, वाक्यप्रचार, म्हणी, कल्पनाविलास यांचा उपयोग केला आहे. त्यांच्या कथांमधून एक प्रकारचा नाद, लय दिसून येते. नामांची, विशेषणांची, क्रियापदांची तर कधी प्रश्नचिन्ह, उद्‌गारवाचक चिन्ह यांची पुनरावृत्ती केलेली आहे असे दिसून येते.

वसंत फेणे यांच्या भाषाशैलीचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी आपल्या बहुतांशी कथामध्ये नागरी भाषेचा वापर केलेला आहे. महानगरीय जीवनातील वास्तवाचे दर्शन घडताना निर्माण झालेली भाषाशैली :

"कोणत्याही महानगरात असतात, तशा गुडांच्या टोळ्या याही महानगरात होत्याच. परंतु एखाद्या शेंगाच्या साथीत विषाणूंचा एकदम खूप प्रसार व्हावा, तसा गुंडगिरीच्या विषाणूंचा साथीसारखा प्रसार गिरणी कामगाराच्यां संपाचे तीन तेरा वाजल्यावर झाला. गिरणी

कामगारांच्या पोरासोरापुरता तो मर्यादित राहिला नाही. त्यांच्या आर्थिक सामाजिक स्तरात तो सहजी प्रसूत झाला.''[१९] पृ. क्र. १४

**'नवी सद्दी येता येता'** या कथेत गिरणगावातील गिरणी कामगारांच्या संपामुळे निर्माण झालेल्या दयनीय अवस्थेचे चित्रण फेणे यांनी केले आहे.

वसंत फेणे यांनी वेगवेगळ्या शैलीत कथा लिहिल्या आहेत. त्यांची प्रश्नचिन्हांच्या पुनरावृत्तीत भाषाशैली मांडण्याची लकब.

''बापा काय असंस्कृत आहेत ? पण आपण येऊ नको म्हटलं तरी तू घरी आलीस. आपणाला ते मनाविरुद्ध सहन करावं लागतं. हा त्यांना आपला पराभव वाटेल. त्यांनी का म्हणून हा पराभव सहन करावा ? त्यांनी असं काय पाप केलंय ?''[२०] पृ. क्र. ६० (मागे परतोनी पाहे)

''डॉक्टरांच्या मनांन त्यांचा छळवाद सुरु केला होता. चंद्रशेखरनं असा निर्णय घेतलाच कसा ? तो हा निर्णय घेऊच कसा शकला ? त्यांन हा विचार कसा केला ? का केला ? कधी केला ? आणि निर्णय घेईपर्यंत त्यानं आपल्यापासून का लपवून ठेवलं ?''[२१] पृ. क्र. २९ (प्रश्न चिमूटभरच)

असे एकापेक्षा अधिक प्रश्नचिन्ह वापरुन उत्कृष्टपणे वाक्यरचना केलेली आहे.त्यामुळे त्यांच्या कथेचा आशय झटपट वाचकाला समजतो. प्रश्नचिन्हांची पुनरावृत्ती हे फेणे यांच्या कथेचे वेगळेपण असल्याचे जाणवते.

प्रश्नचिन्हाबरोबर उद्‌गारवाचक चिन्हांची पुनरावृत्ती त्यांच्या साहित्यातून दिसून येते.

''शी! ती म्हणाली होती, चार दिडक्यांसाठी मास्तरीनं म्हणवून घेण्यापेक्षा नुसतीच ऑफीसरची बायको होणं जास्त मानाचं !''[२२] पृ. क्र. ५५ (नर नारायण)

''गजा SSS! नको रे नको ! पाया पडतो रे तुझ्या.''

गजा SSS! माझ्यावर उपकार कर. ''[२३] पृ. क्र. १६० (अनाकलनीय)

भडव्या ! रांड तुझी बायको ! रां SSS ड साली रां SS ड !

रां SSS ड साली रांड ''[२४] पृ. क्र. ८७. (अल्याड-पल्याड)

दुसऱ्यांना उपदेश देण्यासाठी काही वेळेला मनात होणाऱ्या एखाद्या गोष्टीच्या चलबिचलविषयी तसेच एखादी आठवण करुन देण्यासाठी विशेष ढंगात बोलण्याची एक लकब असते. एखाद्याला समजावून सांगण्यासाठी वापरलेले शब्द आनंद, दु:ख, आश्चर्य, तिरस्कार इत्यादी भावना व्यक्त करण्यासाठी नकळत आपल्या तोंडून उद्‌गारवाचक शब्द बाहेर पडतात. हे शब्द वसंत फेणे यांनी जसेच्या तसेच मांडले आहेत. पण महत्त्वाचे म्हणजे एकाच गोष्टीसाठी काही ठिकाणी तीन तीन वेळा उद्‌गारवाचक चिन्हे त्यांनी वापरलेली आहेत आणि हे त्यांच्या कथालेखनाचे महत्त्वाचे वेगळेपण वाटते.

त्यांनी काही कथामधून इंग्रजी शब्दाचा व वाक्याचा उपयोग केला आहे. त्यामुळे त्यांच्या दोन्ही कथा-संग्रहात परदेशातील वातावरणाचे दर्शन घडते.

**'अल्याड-पल्याड'** या कथेतील लेखक आपल्या सख्ख्या बहिणीला कादंबरी आवडली का ? असे विचारल्यावर तिची त्या कांदबरीविषयी असलेली नाराजी त्याला दिसून येते. तसेच तिने ती वाचलेली नसते. तेव्हा लेखक पुढे इंग्रजी वाक्यात म्हणतो.

''ट्रूथ इज स्टेंजर दॅन फिक्शन हेच खरे''[२५] पृ. क्र. ७७

म्हणजे एखादी गोष्ट निश्चित केलेली असेल तर त्यात सत्यपणा नसतो हेच खरे.

**'ज्याचा त्याचा क्रूस'** या शीर्षक कथेत मार्कला कृष्णवर्णीयांनी जेव्हा मारहाण केली. तेंव्हा नॉरमनने मदतीसाठी आपली मुलगी एरिकाला फोन केला. तेंव्हा त्यांचा जावई फ्रेड याने ॲडम्सकडून उलट निरोप पाठविला की, 'रात्री बाहेर पडणं गोऱ्यांना धोका आहे.' तसेच तो इंग्रजी वाक्यात पुढे म्हणतो.

''ब्लॅक्स आर आऊट टू डिस्ट्रॉय अस, तर उद्याच येतो.''[२६] पृ. क्र. १३४

म्हणजे काळे लोक आपल्याला संपवायलाच बसलेत, तर उद्याच येतो असे म्हणतो.

वसंत फेणे यांनी या दोन्ही कथासंग्रहात शेक हॅड, थँक्यू, स्वारी असे अनेक असंख्य इंग्रजी शब्द वापरलेले आहेत. त्यांच्या कथेची भाषाशैली परदेशी वातावरणाने बहरलेली आहे.

काही कथामधून मुस्लिम व्यक्तिचित्रणाबरोबर त्यांच्या हिंदी भाषेचाही पुरेपूर वापर केलेला आहे. त्यामुळे त्यांच्या कथेला एक वेगळेच स्वरुप प्राप्त झाले आहे.

"कुछ नै ! पानी दो. मै बोत थक गयी"[२७] पृ क्र. १७ (करविता धनी)

"हो SS ? बरं झाल बाई. अल्लाची रहेम"[२८] पृ. क्र. १०८ (धर्मसंकट)

अशाप्रकारे फेणे यांनी हिंदी शब्दांचा, वाक्यांचा वापर केला आहे. त्याचबरोबर ते मुसलमान व्यक्तीच्या दैनंदिन व्यवहारातील घरगुती वापरातील हिंदी भाषेचा वापर मोठ्या खुबीने करतात व मराठी कथेला विविध भाषेचा अलंकार चढवितात.

## निवेदन पद्धती :

निवेदनपद्धतीमध्ये प्रथम पुरुषी निवेदन व तृतीयपुरुषी निवेदन अशा दोन पद्धती आहेत. प्रथमपुरुषी निवेदनामध्ये कथा कांदबरीतील पात्र प्रमुख असणे आणि दुय्यम भूमिका असणारे पात्र निवेदक असणे असे दोन प्रकार आहेत तर तृतीयपुरुषी निवेदनामध्ये निवेदक सर्वज्ञ, सर्वसाक्षी असतो किंवा मर्यादीत क्षमता असलेला निरीक्षक असतो.

वसंत नरहर फेणे यांच्या कथांतील निवेदनामध्ये दोन्ही प्रकारच्या पात्र रचनेतून निवेदन साकारले आहे. "पाणसावल्यांची वसाहत" या कथासंग्रहातील बहुतेक कथांची निवेदनपद्धती प्रमुख पात्रांच्या मुखातून आहे. 'मागे परतोनी पाहे,' 'अल्याड पल्याड' 'कल्पांत कालीन काही क्षण' 'पैसाची पोकळी', 'शोध आणि बोध' व 'बरं का मुलांनो' या कथातून प्रथमपुरुषी 'मी'चे निवेदन येते. 'अल्याड पल्याड' या कथेतील प्रथम पुरुषी निवेदन पद्धतीचे उदाहरण.

'मी म्हणतो थॅंक्यू S ! म्हणतो म्हणजे काय ? माझ्या तोंडून ते जातंच. माझ्या या केविलवाण्या आवस्थेचं मनाच्या एका पातळीवर मला वाईट वाटत असतं; दुसऱ्या पातळीवर मी माझी अशी आवस्था करुन घ्यायचं कारण नाही हेही जाणवत असतं. आणि मनाच्या तिसऱ्या पातळीवर याचीही जाणीव असते की पंकजवर माझे उपकार आहेत. पण तसेच तो माझ्यावर उपकार केल्यागत वागतो."[२९] पृ. क्र. ९७/९८'

अशाप्रकारे प्रथमपुरुषी प्रमुख पात्र असणाऱ्या व्यक्तिरेखांचे निवेदन 'मी' संदर्भात येते.

तृतीयपुरुषी निवेदनातील कथा हकीकत व वृत्तांत रुपात मोडते. या निवेदनपद्धतीला सर्वसाक्षी निवेदन पद्धती असेही म्हणतात. "ज्याचा त्याचा क्रूस" या कथासंग्रहातील सर्व कथा तृतीयपुरुषी निवेदनपद्धतीमध्ये मोडतात. "पाणसावल्यांची वसाहत" या कथासंग्रहातील "नवी सद्दी येता येता" ही एकच कथा तृतीय पुरुषी निवेदन पद्धतीमध्ये मोडते.

**'धर्मसंकट'** या कथेतील तृतीयपुरुषी निवेदनः "नेहमी यावेळी ताहेरा रितेपणात गुरफटलेली असायची ती आज काहीशी उदास नि बरीचशी हताश होती. दार वाजलेलं तिनं ऐकलं. कोण आलं असेल ते तिला उमगेना. कारण प्रेत यात्रा अजून कबरस्तानात पोहचलेली नसणार ! तिनं आठवणीनं 'चादोर' अंगावरुन घेतली. हातमोजेही घातले, तोवर पुन्हा दार वाजलं. ताहेरानं दाराजवळची खिडकी किलकिली करुन पाहिलं. "अरे तू" तिच्या तोंडून आश्चर्याने शब्द बाहेर पडले."[३०] पृ.क्र.९८

वसंत फेणे यांनी अशाप्रकारे उत्कंठावर्धक तृतीयपुरुषी निवेदन वृत्तांत व हकीकत रुपात आपल्या कथेत मांडले आहे.

## संवादलेखन :

संवादाला कथेमध्ये इतर घटकाबरोबरच स्थान असते. संवादाचा कथेमध्ये वापर करताना लेखकाला अतिशय काळजी घ्यावी लागते. काही अभ्यासकांनी कथेची व्याख्या करताना कथा म्हणजे "संवादात्मक चित्रशिल्प" असे म्हटलेले आहे. नाटकाइतके कथेत संवादाला महत्त्व नसले तरी पात्राचे अंतरंग समजण्याच्या दृष्टीने, कथेला गतिमानता येण्याच्या दृष्टीने आणि योग्य असे वातावरण तयार करत कथेचा विकास करण्याच्या दृष्टीने कथेत संवादाला अतिशय महत्त्व असते.

कथेतील संवादातून घटित घटना आणि त्याबद्दलची पात्रांची क्रिया, प्रतिक्रिया समजू शकते. तसेच पात्रगत संवादातून लेखक स्वतःचा जीवनविषयक दृष्टीकोन मांडू शकतो. कथेच्या यशस्वीतेसाठी बांधेसूद मांडणीसाठी संवादाचा अतिशय चांगला उपयोग होतो. संवाद लेखनामुळे कथेत कुतूहल निर्मिती. प्रवाहीपणा व सजीवता निर्माण होते.

वसंत नरहर फेणे हे एक कसबी लेखक आहेत. वास्तव वर्णने आणि प्रत्ययकारी संवाद याद्वारे आपल्या कथा वस्तूचा उत्तम विकास करतात. संवादामध्ये पात्रानुरुप भाषेचा वापर व त्यांच्या स्वभावातील खाचा खोचासह ते आपल्या कथेत मांडतात. त्यामुळे त्यांच्या कथांना एक वेगळीच लज्जत येते. त्यांच्या संवाद कौशल्याचे अनेक नमुने आपणास त्यांच्या कथेत पहावयास मिळतात.

**"ज्याचा त्याचा क्रूस"** या कथासंग्रहातील **'प्रश्न चिमूटभरच'** या कथेतील डॉक्टर आपणच बांधून दिलेल्या वसतिगृहामध्ये राहण्याच्या उद्देशाने जातात. पण तेथे त्यांना प्रिन्सिपलकडून नको ते ऐकून घ्यावे लागते. तेथे त्यांचा अपेक्षाभंग होतो. तेथून ते अध्यक्षाच्या घरी जातात. तेथे त्यांना संस्थेबद्दल तक्रारीच ऐकायला मिळतात. त्यानंतर ते अध्यक्षाच्या घरातून परतत असताना वर्गमित्र यशवंतरावचा प्राध्यापक मुलगा व त्यांच्यातील संवाद -

" डॉक्टरांना खरं तर बोलण्याची इच्छाच उरली नाही. अध्यक्षाकडून परतताना त्यांनी यशवंतरावाच्या प्राध्यापक मुलाला शंका विचारली.

"कॉलेजबद्दल इतकं वाईट ऐकतो; पण वार्षिक अहवालात सर्व परीक्षांचे निकाल चांगलेच लागलेले दिसतात हे कसं.".

डॉक्टरांना लगेच उत्तर मिळाल, " त्यात काय आश्चर्य ? मुलं खुशाल कॉपी करतात! इतक करुनही मुलं नापास होतात हेच आश्चर्य !"

" आणि प्राचार्यांना हे चालत ?" डॉक्टरांचा खुळचटप्रश्न

"प्राचार्यांना चालतं नव्हे, त्यांची फूस असते. आणि सहकार्यही असते म्हणून आम्हालाही सहकार्य करावं लागत."

"चांगल्या विद्यार्थ्यांचे नुकसान ?" डॉक्टरांची क्षीण शंका

"मी तर त्यांना सांगतो, तुम्ही चांगला अभ्यास कराच; त्याचबरोबर इतर विद्यार्थी घेतात ती सवलतही तुम्ही घ्या !"

"अस तुम्ही सांगता ?" डॉक्टरांनी डोळे विस्फारुन विचारलं.

"नाही तर काय डॉक्टरसाहेब, अभ्यासू मुलांचं करियर खलास झालेलं उघड्या डोळ्यांनी पहायचं? त्यातही काहीजण असतात प्रामाणिक ते प्रामाणिकपणे स्वतःच नुकसान करुन घेतात."[३१] पृ. क्र. ४७

प्राध्यापक मुलाच्या या बोलण्यामुळे डॉक्टरांचे बोलणेच बंद होते. या संवादातून फेणे यांनी शैक्षणिक संस्थातील अधांधुंदी कारभारावर प्रकाश टाकला आहे.

'ज्याचा त्याचा क्रूस' या शीर्षक कथेत नॉरमनची मुलगी एरिका ही फ्रेड नावाच्या व्यक्तीच्या प्रेमात पडते. तेव्हा एरिका या आपल्या प्रेमसंबंधाचे गुपित वडिलांसमोर उघड करीत असताना निर्माण झालेला संवाद.

आत येत एरिका थांडीशी कुजबुजली " आज मी पप्पांना सांगणार, फ्रेडला बोलले मी!"

"अ" करुन थांडीनं डोळ्याची बुबळं भुंग्यासारखी नाचवली. तिचे ओठ, गाल वेगळ्याच मार्दवान हसले.

एरिका वडिलांच्या शयनगृह कम अभ्यासिकेत गेली. तिनं आपली चाहूल दिली. एकदा मग पुन्हा !

नॉरमनन लेकीकड पाहिलं. त्याच्या डोळ्यात हिमबिंदूतल्या गारव्याप्रमाणे वात्सल्य दाटल.

" पपा मी आज फार चांगली म्हणजे फार महत्त्वाची बातमी सांगणार आहे."

नॉरमननं वायोलिनवर 'बो' नं थडथाड थडथाड असे आघात केले नि सुरांची बहार उडविली ! आणि त्यानं हसत विचारलं, "का गं प्रेमात बिमात पडलीस काय ?"

"आ ऽ थांडीन सांगितल होत ?"

" मी नाय हा" मागावर असलेल्या थांडीनं खोलीच्या दारात येत म्हटलं.

एरिकाची खात्री झाली. पपानी बरोबर ओळखलय.

" कोण तो पागल ? करतो काय ?"

" फ्रेड-फ्रेडरिक शेफर, तो एका कंपनीत एक्झिक्युटिव्ह आहे. कंपनी कंपनीच नाव विसरले !"

नॉरमन खदखदून हसला.

" पण पपा, तुला फ्रेड आवडेल; फार चांगला आहे."

नॉरमन अधिकच खदखदला " आणणार कधी त्याला ?"

" येत्या रविवारी चालेल ना पपा ?"

" हो मार्कला सांग रविवार मोकळा सोडायला. मार्कला पण मैत्रीण भेटली की नाही गं ?"[३२] पृ. क्र. ११९/१२०

या संवादातील नॉरमन एरिका, मार्क फ्रेड व थांडी ह्या व्यक्तिरेखा, जोहान्सबर्गमधील म्हणजे परदेशातील असून त्यांना इतक्या सरावाने शुध्दप्रवाही मराठी भाषा बोलता येणे हे अशक्य आहे. त्यामुळे स्वतः लेखकच त्यांच्या मुखातून बोलतो आहे असे जाणवते. ही परदेशी नावे या व्यक्तीना चिकटविल्यासारखी वाटतात. त्यांचे संवाद कथेतून बाजूला घेऊन वाचले असता या भारतीय (महाराष्ट्रीय) व्यक्तीच वाटतात. या संवादातून त्यांची प्रादेशिकता व्यक्त होत नाही ही त्रुटी या संवादात जाणवते.

"**पाणसावल्यांची वसाहत**" या कथासंग्रहातील '**पैसाची पोकळी**' या कथेत अमेरिकेत असलेली सरोजाबाईंची नात मिनू हिला मुलगा होतो. ही बातमी सरोजाबाईंना फोनवरुन अंजू देत असताना निर्माण झालेला संवाद.

"हॅलो SS

हॅलो SS आई मी अंजू बोलतेय. तुला पणतू झाला.

हॉस्पिटलमधून बोलते. बाळ-बाळंतीण एकदम खुशाल.

कधी झाला ? किती वाजता ?

आता अर्धा तास झाला. म्हणजे तिकडे आता रात्रीच साडेबारा झाले असतील ना.

साडे बारा का ? कसा आहे मुलगा ? वजन किती ?

चांगला आहे. वजन

आणि हो कशी आहे मिनू ?

मिनू चांगली आहे. थांब थांब आई मिनूला तुझ्याकडं बोलायचय

हॅलो आज्जी SS

कशी आहेस ग पोरी तू ? त्रास झाला फार ?

बरी आहे, त्रास झाला फार नाही. आज्जी SS आज्जी ऐकू येतं ?

काय ते ?

नाय ? अगं आता तो रडत होता. थांबला आता.

हो SS हो SS मला ऐकता येईल का ग ?

आई मी अंजू बोलते. आता त्यानं ट्यँहा केल की फोन त्याच्याकडे धरते. म्हणजे तुला आवाज ऐकायला येईल !

थांबाव लागेल हाँ.........आई मिनू म्हणते बाळाला चिमटा काढ म्हणजे रडेल.

हो फुकटात मिळालायना ? त्याच्यासाठी चार डॉलर नाही खर्च करावे लागले ?

आई ऐक ऐक.....

हँ, हँ. हाँ-हाँ, हँ. हँ, हाँ-हाँ

होSS चांगलं ऐकलं. फार आनंद होतोय गं, फार आनंद होतोय.

मनीषा झोपलीय वाटतं ? तिला सांग आता ठेवते.

घरनं फोन करते मग तुमच्याकडं पहाट होत असताना. ठेवते गं "[३३] पृ.क्र.१२०

या संवादातून सरोजाबाईंना पणतूविषयी अतुरता स्पष्ट होते. फेणे यांनी हा संवाद दुरध्वनीवरुन साधलेला आहे. हेच त्यांच्या कथेचे वेगळेपण असल्याचे जाणवते.

वसंत नरहर फेणे यांच्या कथालेखनातील संवाद हे मार्मिकपणे उतरले आहेत. ते पात्रांच्या तोंडी नागरी भाषेचा वापर करताना दिसतात. फेणे यांच्या संवादातून पात्रांचे स्वभाव, मनोदर्शन, विशिष्ट लकबी, सवयी यांची ओळख चटकन होते. फेणे यांचे संवाद विलक्षण उत्कंठावर्धक आहेत. कथानक पुढे नेण्यात संवादाचा उपयोग करण्याचे कौशल्य वसंत फेणे यांनी चांगले हाताळले आहे.

## पत्रात्मक, मुलाखत व दूरध्वनी इ. लेखनतंत्र

वसंत नरहर फेणे यांनी मराठी कथेत एक वेगळाच प्रयोग केला आहे. त्यांनी पत्रात्मक, मुलाखत व दूरध्वनी असे अपरिचीत लेखन तंत्र वापरल्यामुळे कथेला एक वेगळीच लज्जत आलेली आहे. त्याचबरोबर कथेचे स्वरुप भरीव झालेले दिसून येते.

**'मागे परतोनी पाहे'** या कथेची सुरूवात पत्रातून करून त्यांनी कथेत एक वेगळाच प्रयोग केला आहे.

'' घरी परतले

धनू नाहीच गावात तो नाशिकहून उद्या परतायचाय.

लॅच की चालवली. दार ढकललं.

तर दारातच पत्र. लिफाफा

आलेच आहे पत्र, तर उचलावं म्हणून उचललं.

कुणाचं असेल हे कुतूहल नव्हतच.

लिफाफा ताईचा, काहीसं नवल, कदाचित ते ह्री नसाव''[३४] पृ. क.३७

त्यांनतर रुपाने पत्र उघडल्यावर '' प्रिय चि. कु. रुपाला आशीर्वाद''[३५] पृ. क्र. ३८ या मायन्यापासून कथेला खरी रंगत येते.

पत्रात्मकतेबरोबर फेणे यांनी 'शोध आणि बोध' या कथेत मुलाखत वजा कथालेखन केले आहे. या कथेतील लेखक हा एक शिक्षक असून, त्याने त्याच्याच स्टाफमधील शिक्षिका असलेल्या विद्याताई पासून तिचा भाऊ, रामभाऊ, बाबूराव, बाबासाहेब, शेवंताबाई इत्यादींच्या मुलाखती घेऊन बाबूराव या बाहेरख्याली वाया गेलेल्या व्यक्तीची सत्यता जाणण्याचा प्रयत्न केला आहे.

त्याचबरोबर फेणे यांनी 'पैसाची पोकळी' , 'प्रश्न चिमूटभरच' या कथेमध्ये दूरध्वनीचा वापर केल्याचे दिसून येते. ज्यावेळी सरोजाबाईंची नात मिनू ही बाळंत होणार असते तेव्हा सरोजाबाईंना तिची काळजी वाटत असते. तेव्हा सरोजाबाई व मिनू यांच्यातील दूरध्वनीवरील संवाद -

'हॅलो SS

हॅलोSS मी मुंबईहून आई बोलतेय.

कोण आज्जी ? हाऊ आर यू आज्जी माय डियरेस्ट

आज्जी ?

ए डियरेस्टवाली ! तू बोलतेस हो ?

हो, मी बोलायचं नाही ?

तू कशी आहेस म्हणून विचारायला फोन केला मी ''[३६] पृ.क्र.११७

या कथेत फेणे यांनी जास्तीत जास्त दूरध्वनी संभाषणाला महत्त्व दिले आहे.

**"ज्याचा त्याचा क्रूस"** या कथासंग्रहातील **'प्रश्न चिमूटभरच'** या कथेत डॉक्टरांनी स्वतः बांधून दिलेल्या वसतिगृहात राहावयास जागा मिळत नाही व तेथे त्यांना भारतातील भ्रष्टाचाराची ओळख होते. त्यामुळे ते अमेरिकेत रहावयास जाण्यास तयार होतात. ते आपल्या अमेरिकेतील सुनेला फोन करतात व तिला फोनवरुन म्हणतात.

" अग तू काही दिवसांची सवड काढून ये गं. नाही नाही मी चांगला आहे. मी तुझ्याकडे यायचा निर्णय घेतलाय. हो कायम. इथल्या वस्तू, जागा सारं विकायचय. बंडोपंत ? त्यांच तो बघून घेईल. हो, हो, मी बरा आहे.''[३७] पृ. क्र.४९

अशा तऱ्हेने फेणे यांनी कथांमधून पत्राचा मुलाखतीचा, दुरध्वनीचा वापर केलेला आहे. त्यामुळे हे त्यांच्या कथेचे वेगळेपण असल्याचे जाणवते.

अशाप्रकारे वसंत नरहर फेणे यांच्या कथालेखनातील व्यक्तिचित्रणे, प्रसंग, वातावरण, आशय जाणीवा व भाषीक वैशिष्ट्ये पाहता त्यांचे लेखन अतिशय समृध्द असून वाङ्.मयीनदृष्ट्या परिपूर्ण असल्याचे दिसते.

# वसंत नरहर फेणे यांच्या कथांचे अन्य काही विशेष

## प्रास्ताविक

वसंत फेणे यांच्या वाङ्.मयीन अभिव्यक्ती विशेषाबरोबर त्यांच्या कथेची अन्य काही महत्त्वाची वैशिष्ठ्ये दिसून येतात. त्या वैशिष्ट्यांचा अभ्यास करणे अत्यंत आवश्यक आहे. कारण त्यामुळेच त्यांच्या कथेला चांगली लज्जत आलेली दिसून येते. त्यांच्या कथामधून आलेली महानगरीय जीवनाचे चित्रण, परदेशी जीवनाचे चित्रण वृध्दांच्या व्यथा, वेदनांचे चित्रण, राजकीय ताणतणावाचे चित्रण, मुस्लिम जीवनाचे चित्रण ही वैशिष्ट्ये वाङ्.मयीन अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वाची आहेत. त्यांचा थोडक्यात आढावा घेऊ.

## महानगरीय जीवनाचे चित्रण

वसंत फेणे हे मुंबई शहरात वास्तव्यास असल्यामुळे त्यांच्या कथेवर मुंबईतील महानगरीय जीवनाची छाप पडलेली आहे. त्यांनी आपल्या कथेत महानगरीय भाषेचा वापरही केलेला आहे. त्यांनी आपल्या " ज्याचा त्याचा क्रूस" "व पाणसावल्यांची वसाहत" या दोन्ही कथासंग्रहातील बहुतांशी कथामध्ये मुंबई शहरातील जनजीवनाचे दर्शन घडविले आहे. त्यांच्या 'नरनारायण', नवी सद्दी येता येता' आणि 'मागे परतोनी पाहे' या कथांमधून महानगरीय जीवनाचे दर्शन घडते.

मुंबई या महानगरातील मानवी व्यथा-यातनांचे चित्रण, शहरीकरणाचा वाढता प्रभाव, शहरातील गर्दीचे चित्रण, बदलते मानवी जीवन, जगण्याची धडपड, जीवनाची घालमेल इत्यादीवर फेणे यांनी आपल्या कथांमधून प्रकाश टाकला आहे.

'नवी सद्दी येता येता ' या कथेत गिरणी कामगारांच्या संपामुळे निर्माण झालेल्या महानगरातील दयनीय आवस्थेचे चित्रण केले आहे. संपामुळे निर्माण झालेली बेकारी आणि बेकारीमुळे त्रस्त झालेल्या तरुण वर्गाला जगण्यासाठी करावी लागत असलेली धडपड याचे

चित्रण केले आहे. तर 'मागे परतोनी पाहे' या कथेत महानगरीय बदलत्या जीवनाचे चित्रण केले आहे.

**'नरनारायण'** या कथेत विभूती आणण्यासाठी गेलेल्या वामनची शेवटची गाडी चुकते. त्यामुळे त्याला रात्र डोंबिवली स्टेशनवर काढावी लागते. इथे फेणे यांनी महानगरातील गर्दीचे, धावपळीच्या जीवनाचे चित्रण केले आहे. तसेच 'प्रश्न चिमूटभरच','पैसाची पोकळी' या कथेतील प्रमुख पात्रे मुंबई शहरातील असल्यामुळे त्यांच्या व्यथा वेदनेतून महानगरीय जीवनाचे दर्शन घडते.

## परदेशी जीवनाचे चित्रण

वसंत नरहर फेणे यांनी परदेशी दौरा केलेला असल्यामुळे त्यांच्या साहित्यात परदेशी जीवनाचे चित्रण भरपूर प्रमाणात आलेलेदिसते. त्यांच्या '' ज्याचा त्याचा क्रूस'' आणि '' पाणसावल्यांची वसाहत'' या दोन कथा संग्रहावर परदेशी जीवनाची मोठ्या प्रमाणात छाप पडलेली आहे. त्यांच्या 'प्रश्न चिमूटभरच', 'धर्मसंकट', 'ज्याचा त्याचा क्रूस', 'कल्पांत कालीन काही क्षण', 'पैसाची पोकळी' या कथांमध्ये परदेशी जीवनातील राजकीय वातावरणाचे तेथील मानवी व्यथा वेदनांचे चित्रण आलेले आहे. या कथांमधून ते अमेरिका तेहरान, इराण, जोहान्सबर्ग, सोविएत रशिया, जार्जिया या परदेशातील जीवनविश्वाचा वेध घेतात.

'ज्याचा त्याचा क्रुस' या शीर्षक कथेत जोहान्सबर्गमधील श्वेतवर्णीय व कृष्णवर्णीय यांच्यातील लढ्याचे चित्रण, 'कल्पांतकालीन काही क्षण' या कथेत सोविएत संग्रहातील रशियन जीवनातील फुटीचे चित्रण तर 'धर्मसंकट' या कथेत तेहरान, इराणमधील मुस्लिम जीवनाचे चित्रण केलेले आहे. फेणे यांनी आपल्या कथांमधून परदेशातील वास्तव जीवनाचे दर्शन घडविले आहे. 'प्रश्न चिमूटभरच', 'पैसाची पोकळी' या कथेतील प्रमुख पात्रे भारतातील असली तरी या कथेतील दुय्यम पात्रे परदेशातील आहेत. त्यामुळे या कथांतून फेणे यांनी परदेशी जीवनाचा वेध घेतला असल्याचे दिसून येते.

## वृध्दांच्या व्यथा वेदना व समस्यांचे चित्रण

वसंत फेणे यांनी आपल्या " **ज्याचा त्याचा क्रूस**" आणि "**पाणसावल्यांची वसाहत**" या दोन्ही कथा संग्रहातील कथामध्ये वृध्दांच्या व्यथा, वेदना व समस्या यांचे चित्रण केले आहे. फेणे यांच्या मनात वृध्द व्यक्तीबद्दल कणव असल्यामुळे त्यांनी आपल्या कथांतून वृध्दांच्या अंतर्मनाचा वेध घेतला आहे. ते आपल्या कथेमध्ये वृध्दांचे चित्रण करत असताना त्यांच्या अंतर्मनातील दुःख त्यांच्या व्यथेसह टिपतात. त्यादृष्टीने 'प्रश्न चिमूटभरच', 'आकाशपुष्प', 'अनाकलनीय', 'कल्पांतकालीन काही क्षण', 'पैसाची पोकळी' या कथा अतिशय महत्त्वाच्या आहेत.

**'प्रश्न चिमूटभरच'** मधील वृध्द डॉक्टरांना आपल्या मुलाने भारतात राहून येथील लोकांची सेवा करावी. त्यासाठी त्याने भारतातच इस्पितळ चालू करावे अशी त्यांची इच्छा असते. पण मुलगा त्यांच्या इच्छेविरूद्ध अमेरिकेत स्थायीक होतो. त्यामुळे ते हताश होतात. त्यातच त्यांच्या पत्नीचा अचानक मृत्यू होतो. तेव्हा तर ते विलक्षण एकटे पडतात. त्यानंतर काही कालावधीतच त्यांचा मुलगा चंद्रशेखर किडणीच्या आजाराने मृत्यूमुखी पडतो. त्यामुळे त्यांना वृध्दवयात जे दुःख, वेदना होतात त्याचे हृदयस्पर्शी चित्रण फेणे यांनी या कथेत केले आहे.

**'आकाशपुष्प'** या कथेमध्ये मुलग्याच्या वेडाचारामुळे आई वडिलांना जो त्रास होतो आणि त्रास होऊनही वेड्या मुलाचा मृत्यू होतो त्यामुळे वृध्द आई वडिलांना जे दुःख होते त्याचे चित्रण फेणे यांनी केले आहे. 'अनाकलनीय' या कथेत वृध्दांच्या अनेक समस्यावर प्रकाश टाकला आहे. घरातील अनेक कटकटीमुळे किंवा मुलगा व सुनेने घरातून बाहेर काढल्यामुळे किंवा आप्तांनी संबंध तोडल्यामुळे अशा अनेक समस्यामुळे वृध्दांना ज्या व्यथा-यातना होतात याचे प्रत्ययकारी चित्रण फेणे यांनी या कथेत केले आहे.

**'कल्पांत -कालीन काही क्षण'** या कथेत सेवा निवृत्त असलेल्या वृध्द 'दमित्री' या रशियन सैनिकाची कैफियत फेणे यांनी मांडली आहे. तसेच 'पैसाची पोकळी' या कथेत

नवऱ्याच्या मृत्यूमुळे व मुलगी व नात अमेरिकेत राहत असल्यामुळे वृध्द सरोजाबाईंना जी एकटेपणाची उणीव भासते त्याचे प्रत्ययकारी चित्रण फेणे यांनी केले आहे.

## राजकीय ताणतणावाचे चित्रण

वसंत फेणे यांनी कथालेखन करताना **"ज्याचा त्याचा क्रूस"** आणि " **पाणसावल्यांची वसाहत**" या कथासंग्रहातील कथांमध्ये राजकीय वातावरणावर प्रकाशझोत टाकून ज्या त्या भागातील राजकीय ताणतणावाचे चित्रण उत्कृष्ट प्रकारे केले आहे हे चित्रण करताना त्यांनी देशातील परदेशातील राजकीय घडामोडीतील ताणतणावाचा वेध घेतला आहे. त्यांच्या 'धर्मसंकट' 'ज्याचा त्याचा क्रूस', 'नवी सद्दी येता येता', 'कल्पांत-कालीन काही क्षण' या कथा राजकीय ताणतणावाने बहरलेल्या आहेत.

फेणे यांनी 'धर्मसंकट' या कथेत इराण तेहरानमधील शाह राजवट, खुमेनी राजवट व फिदाय गेरीला संघटना यांच्यातील कडवट राजकीय ताणतणाव 'ज्याचा त्याचा क्रूस' या कथेत जोहान्सबर्गमधील गोरे व काळे यांच्यातील ताणतणाव, 'नवी सद्दी येता येता' या कथेत मुंबईतील राजकीय वातावरण, ताणतणाव आणि गुन्हेगारी प्रवृत्तीचे चित्रण केले आहे.

त्याचबरोबर फेणे यांनी 'कल्पांत-कालीन काही क्षण' या कथेत सोविएत संघ राज्यातील फुटीमुळे निर्माण झालेल्या ताणतणावाचे प्रत्ययकारी चित्रण केले आहे.

## मुस्लिम जीवनाचे चित्रण

वसंत फेणे यांनी आपल्या काही कथामधून मुस्लिम जीवनाचे चित्रण केले आहे. त्यादृष्टीने 'करविता धनी' व 'धर्मसंकट' या दोन कथा महत्त्वाच्या आहेत. त्यांनी या दोन कथांतून मुस्लिम पात्रांच्या अंतर्मनाचा वेध घेतला आहे.

**'करविता धनी'** या कथेत मुस्लिम कुटुंबाच्या दारिद्र्याचे दर्शन घडविले आहे. या कथेतील रहिमतबी ही दारिद्र्यामुळे एका तेलगिरणीत कामाला लागते. तिथे तिचे

संबंध येतात.
गिरणीमालक धर्माप्पाशी आपण या अनैतिक संबंधाच्या पाशात कसे काय अडकलो ? याचे तिला आश्चर्य वाटते. तेव्हा तिचेच मन तिला खाते. ती स्वतःशीच पुटपुटते.

"चांगल्या कुलशीलवान माँ-बापाची चांगली कुलशीलवान बेटी आपण. कधी कुणाकडे वाकड्या नजरेनं पाहिलं नाही आपल्या माँची शिकवणच तशी. आणि या वयात तीन बच्च्यांची माँ झाल्यावर आपला भेजा असा कसा बेवकूफ बनला ?"[३८] पृ. क्र. २० असा तिला प्रश्न पडतो.

दारिद्र्याला कंटाळून कामासाठी घराबाहेर पडलेल्या कुलशीलवान मुस्लिम स्त्रीच्या अगतिकतेचे चित्रण फेणे यांनी केले आहे.

त्याचबरोबर 'धर्मसंकट' या कथेत पाश्चात्य शिक्षणाचा प्रभाव पडलेल्या मध्यमवर्गीय सामान्य लोकांना कट्टर इस्लामीवादी राजवटीच्या जाचक बंधनामुळे जीवन जगणे असह्य होते. याशिवाय स्त्रियांना तर या राजवटीने पुरुषापेक्षाही जाचक बंधने घातल्यामुळे स्त्री मनाच्या होणाऱ्या घुसमटीचे चित्रण फेणे यांनी केले आहे. या कथेत 'इमाम' ला अधिक महत्व देण्यात आले आहे. एकंदरित फेणे यांनी या दोन्ही कथांत मुस्लिम जीवनाचे चित्रण केले आहे.

## निष्कर्ष

- प्रस्तूत प्रकरणात वाङ्.मयीन अभिव्यक्तीचा अभ्यास करताना व्यक्तिचित्रणे, प्रसंगनिर्मिती, वातावरणनिर्मिती, आशय जाणिवा व भाषिक वैशिष्ठ्ये यांचा थोडक्यात आढावा घेतला आहे.
- व्यक्तिचित्रणातून फेणे यांनी व्यक्तीच्या स्वभावाचे, त्यांच्या भावभावनांचे व त्यांच्या वृत्तीचे दर्शन वाचकांना घडवून, त्यांनी त्या व्यक्ती कथेत जशाच्या तशा उभ्या केल्याचे दिसून येते.

- फेणेप्रसंग निर्मितीतून मानवी जीवनातील सुख-दु:ख, व्यथा-वेदना यांचे अगदी वास्तव स्वरुपातील प्रसंग चित्रण आपल्या कथांमधून करताना दिसतात. याचा वाचकांना प्रत्यय येतो.
- वसंत फेणे यांच्या बहुतांशी कथेची सुरूवात वातावरण निर्मितीने झाल्याचे दिसून येते. त्याचबरोबर ते कथेत कोणताही प्रसंग घडविण्यापूर्वी उत्कृष्ट अशी वातावरण निर्मिती करतात. त्यामुळे पुढे काय घडणार आहे हे वाचकाच्या चटकन लक्षात येते.
- वसंत फेणे यांनी आपल्या कथांतून वेगवेगळ्या स्वरुपाचे आशय घेतलेले दिसून येतात त्याशिवाय हे आशय त्यांनी शहरी व परदेशी वातावरणातून घेतल्याचे दिसून येते. त्याचबरोबर त्या आशयामध्ये स्वातंत्र्यविषयक, आरोग्यविषयक, समाजविषयक, धर्मविषयक, वृध्दत्वविषयक यासारख्या अनेक जाणिवा त्यांनी आपल्या कथामध्ये मांडल्याचे प्रत्ययास येते.
- फेणे यांच्या भाषिक वैशिष्ट्यामधून भाषाशैली, निवेदन पध्दती, संवाद लेखन व पत्र मुलाखत व दूरध्वनी,इ. लेखनतंत्र आदीचा थोडक्यात आढावा घेतला आहे.
- फेणे यांनी आपल्या कथांतील भाषा शैलीमध्ये महानगरीय भाषा, इंग्रजी, हिंदी वाक्यांचा, शब्दांचा वापर पुरेपूर केल्याने त्यांच्या कथेमधील भाषा आकर्षक बनल्याची दिसून येते.
- फेणे यांनी आपल्या सर्व कथांमध्ये उत्कृष्ट अशा प्रथम पुरुषी व तृतीयपुरुषी निवेदन पध्दतीचा वापर केल्याचे दिसून येते.
- फेणे यांनी कथांतील संवादामध्ये पात्रानुरुप भाषेचा वापर करून पात्राचे स्वभाव, त्यांच्या मनातील भावना, त्यांच्या विविध लकबी यांचे चित्रण केले असल्याचे दिसून येते.
- फेणे यांच्या भाषिक वैशिष्ट्यामध्ये आणखी एक महत्त्वाचा विशेष म्हणजे त्यांनी कथांतून पत्रात्मक, मुलाखत, दूरध्वनी इ. तंत्र वापरून एक वेगळाच प्रयोग केल्याचे दिसून येते.

- फेणे यांच्या अन्य कथा विशेषामध्ये महानगरीय जीवन, परदेशी जीवन, वृध्दांच्या व्यथा वेदना व समस्या, राजकीय ताणतणाव, मुस्लिम जीवन इत्यादींचा आढावा घेतला आहे.
- फेणे यांच्या महानगरीय जीवन चित्रणातून मानवी व्यथा-वेदना, शहरीकरणाचा वाढता प्रभाव, गर्दीचे चित्रण, बदलते मानवी जीवन, मानवाची जगण्यासाठीची धडपड इत्यादीचे दर्शन घडते.
- फेणे यांनी आपल्या कथातून अमेरिका, तेहरान, इराण, जोहॉन्सबर्ग, सोविएत रशिया, जार्जिया अशा अनेक परदेशातील जीवन विश्वाचा वेध घेतला आहे. या परदेशी जीवनातून त्यांनी राजकीय वातावरण, ताणतणाव, व्यथा वेदना यांचे चित्रण केलेले दिसून येते.
- फेणे यांच्या 'प्रश्न चिमूटभरच', 'आकाशपुष्प', 'अनाकलनीय' कल्पांतकालीन काही क्षण, 'पैसाची पोकळी' या कथातून वृध्दांचे दुःख व्यथा-यातना, एकटेपण, त्यांच्या समस्या इत्यादीवर प्रकाश टाकलेला दिसून येतो.
- फेणे यांच्या 'धर्मसंकट', 'ज्याचा त्याचा क्रूस', 'नवी सद्दी येता येता', 'कल्पांतकालीन काही क्षण' या कथांमधून देशातील परदेशातील राजकीय वातावरण व राजकीय ताणतणाव यांचे दर्शन घडते.
- तसेच फेणे यांच्या 'करविता धनी', 'धर्मसंकट' या दोन महत्त्वाच्या कथातून मुस्लिम पात्रांच्या अंतर्मनाचा, त्यांच्या अगतिकतेचा व त्यांच्या घुसमटीचा वेध घेतलेला दिसून येतो.
- अशा प्रकारे फेणे यांच्या कथालेखनातील वाङ्.मयीन अभिव्यक्तिचा आढावा घेतला असता त्यांचे कथालेखन समृध्द व परिपूर्ण असल्याचे प्रत्ययास येते.

# प्रकरण चौथे
# संदर्भ -सुची


| | | | |
|---|---|---|---|
| १) | फडके ना. सी. | : | 'प्रतिभासाधन', १९३१, पृ.क्र.१०९ |
| २) | गाडगीळ गंगाधर | : | 'खडक आणि पाणी' उत्कर्ष प्रकाशन<br>दु. आ. १९९६, पृ.क्र. २२५ |
| ३) | फेणे वसंत नरहर | : | 'ज्याचा त्याचा क्रूस'<br>मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई -४<br>प्र. आ. १९९५, पृ. क्र. १२ |
| ४) | फेणे वसंत | : | तत्रैव, पृ. क्र. ४९ |
| ५) | फेणे वसंत | : | 'पाणसावल्यांची वसाहत'<br>स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद,<br>प्र. आ. २००१ पृ. क्र. ५१ |
| ६) | फेणे वसंत | : | तत्रैव, पृष्ठ क्रमांक १११ |
| ७) | फेणे | : | तत्रैव पृष्ठ क्रमांक १३९ |
| ८) | फेणे | : | उनि, पृष्ठ क्रमांक ७ |
| ९) | फेणे | : | तत्रैव, पृष्ठ क्रमांक ४२ |
| १०) | फेणे | : | उनि, पृष्ठ क्रमांक ३५ |
| ११) | फेणे | : | तत्रैव पृष्ठ क्रमांक १०१/१०२ |
| १२) | कुलकर्णी वा. ल. | : | 'जीवंत रेखीव कथा'<br>आलोचना प्रकाशन, १९८७, पृ. क्र. ५ |
| १३) | फेणे | : | उनि 'ज्याचा त्यांचा क्रूस', पृ. क्र. १ |
| १४) | फेणे | : | तत्रैव, पृष्ठ क्रमांक ७८ |
| १५) | फेणे | : | तत्रैव, पृष्ठ क्रमांक १०४ |
| १६) | फेणे | : | उनि, 'पाणसावल्यांची वसाहत' पृ. क्र. १८ |

| | | | |
|---|---|---|---|
| १७) | फेणे | : | तत्रैव, पृष्ठ क्रमांक १२० |
| १८) | नेमाडे भालचंद्र | : | 'साहित्याची भाषा'<br>सकित प्रकाशन, औरंगाबाद,<br>दु. आ. १९९८, पृ. क्र. १६ |
| १९) | फेणे | : | उनि, 'पाणसावल्यांची वसाहत', पृ. क्र.१४ |
| २०) | फेणे | : | तत्रैव पृष्ठ क्रमांक ६० |
| २१) | फेणे | : | उनि, 'ज्याचा त्याचा क्रूस' पृ. क्र. २९ |
| २२) | फेणे | : | तत्रैव, पृष्ठ क्रमांक ५५ |
| २३) | फेणे | : | तत्रैव, पृष्ठ क्रमांक १६० |
| २४) | फेणे | : | तत्रैव, पृष्ठ क्रमांक ८७ |
| २५) | फेणे | : | उनि, पृष्ठ क्रमांक ७७ |
| २६) | फेणे | : | उनि, पृष्ठ क्रमांक १३४ |
| २७) | फेणे | : | तत्रैव, पृष्ठ क्रमांक १७ |
| २८) | फेणे | : | तत्रैव, पृष्ठ क्रमांक १०८ |
| २९) | फेणे | : | उनि, पृष्ठ क्रमांक ९७/९८ |
| ३०) | फेणे | : | उनि, पृष्ठ क्रमांक ९८ |
| ३१) | फेणे | : | तत्रैव, पृष्ठ क्रमांक ४७ |
| ३२) | फेणे | : | तत्रैव, पृष्ठ क्रमांक ११९/१२० |
| ३३) | फेणे | : | उनि, पृष्ठ क्रमांक १२० |
| ३४) | फेणे | : | तत्रैव, पृष्ठ क्रमांक ३७ |
| ३५) | फेणे | : | तत्रैव, पृष्ठ क्रमांक ३८ |
| ३६) | फेणे | : | तत्रैव, पृष्ठ क्रमांक ११७ |
| ३७) | फेणे | : | उनि, पृष्ठ क्रमांक ४९ |
| ३८) | फेणे | : | तत्रैव, पृष्ठ क्रमांक २० |